स्थायी समितीच्या **मंगळवार दिनांक 27–02–2018** रोजी **दुपारी 03–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## <u>उपस्थित सभासद</u>

| | | |
|---|---|---|
| **1.** | **श्री. संदिप चंद्रभान जाधव** | **सभापती** |
| 2. | श्रीमती संगीता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 3. | श्रीमती उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| 4. | श्रीमती दुर्गा चंद्रभुषण हत्तीठेले | सदस्या |
| 5. | श्रीमती भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| 6. | श्रीमती नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| 7. | श्रीमती सरला कमलेश नायक | सदस्या |
| 8. | श्रीमती मनिषा सुनिल कोठे | सदस्या |
| 9. | श्रीमती सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| 10. | श्रीमती लता सुनिल काडगाये | सदस्या |
| 11. | श्रीमती जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| 12. | श्री. हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |
| 13. | श्रीमती अंसारी सय्यदा बेगम मो.निजामुद्दीन | सदस्या |
| 14. | श्री. मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |

## <u>अनुपस्थित सभासद</u>

| | | |
|---|---|---|
| 1. | श्रीमती रिता अशोक मुळे | सदस्या |

## <u>उपस्थित अधिकारी</u>

1. श्री. रविन्द्र कुंभारे, अति. आयुक्त
2. श्री. रविन्द्र देवतळे, अति. उपायुक्त (2)
3. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 527</u>:– नागपूर शहर पेंच टप्पा –४, भाग – ४, अंतर्गत उर्वरित वितरण {जलप्रदाय विभाग} जलवाहिन्या टाकण्याच्या कामाचे रू. ३,७३,२३,८५०/– या रक्कमेच्या सुधारीत प्राकलनास मंजुरी प्रदान करण्याचा तसेच हे काम नियमीत निविदा बोलावुन करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 528ः—** स्थायी समिती ठराव क्र. 77, दिनांक 23/6/2017 मधील
**{समाजकल्याण विभाग}** अटी व शर्तीनुसार जिवन तरूण विमा याजने अंतर्गत लाडली लक्ष्मी विमा योजनेचा दर सहा महिन्याचा प्रगती अहवाल स्थायी समिती समोर सादर करणे अनिवार्य आहे. त्या अनुषंगाने विभागामार्फत लाडली लक्ष्मी योजना राबविण्याकरिता निवड करण्यात आलेल्या अभिकर्ता मार्फत सदर योजनेचा प्रगती अहवाल मागविण्यात आलेला असुन उक्त प्रगती अहवाल स्थायी समितीसमोर माहितीकरिता ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन एकमताने नोंद घेतली.

**ठराव क्रमांक 529ः—** प्रभाग क्र. 3 (ब) अंतर्गत विनोबा भावे नगर येथे सिमेंट
**{लोककर्म झोन 09}** कॉक्रीट रस्ते तयार करण्याच्या कामाकरिता प्राप्त एकूण 4 निविदापैकी मे. उल्हास इंन्टरप्राजेस यांची प्राकलनीय राशी. रु. 29,76,456/— पेक्षा 15.03 टक्के कमी दराची रू. 25,29,094/— च्या निविदेस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 530ः—** प्रभाग क्र. 23 क देशपांडे ले आउट येथे 1) श्री हेडाऊ ते श्री
**{लोककर्म झोन 08}** खोब्रागडे व 2) हनुमान मंदीर ते श्री कारेमोरे यांचे घरापर्यंत सिमेंट कॉक्रीट रस्त्याचे बांधकाम करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदाकार मे. संतोष खरपकर यांची प्राकलनीय दरा पेक्षा 12.59 टक्के कमी दराची रु. 33,72,006/— राशीची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 531ः—** नागपूरच्या सार्वजनिक ठिकाणी ऑटोमेटेड सोलर ऊर्जेवर
**{बाजार विभाग}** आधारीत Eco-Friendly Water Wending Machine लावण्यासाठी जागा 11 महिन्याच्या परवान्यावर मिळण्याबाबत.

ॲडवेल इंडीया गृप प्लॉट क्र. 66 सुर्वे नगर नागपूर यांनी सामान्य प्रशासन विभाग म.न.पा. नागूपर येथे पत्र क्र. 5485/टि.आर. दि. 22/11/2017 ला पत्र दाखल करून विषयांकित कार्य सुरू करण्याकरीता विभागाला जागेची मागणी केलेली आहे.

ॲडवेल इंडीया गृप, नागपूर यांचा अर्ज बाजार विभागास पत्र क्र. 1825/टि.आर. दि. 29/11/2017 नुसार नस्ती तयार करून मा. सहा. आयुक्त (बाजार) यांच्याकडे सादरीकरण केल्यानंतर त्यांनी उपस्थित केलेल्या 4 मुद्याबाबत संबंधीत कंम्पनीला विचारणा करून त्यान्वये चार मुद्याचे संबंधीतांना पत्र देवून निराकरण केलेले असून नस्तीच्या उजव्या बाजूस टांचण आहे. संबंधीत कंम्पनीला मशीन लावण्यासाठी जागेची आवश्यक्ता असून नागपूर महानगरपालिका बाजाराचे कॉम्पलेक्स ज्या—ज्या ठिकाणी आहे त्या—त्या ठिकाणी 3 X 3 = 9 चौ.फुट (1.00 चौ.मी.) अशी जागा लागणार असून नागपूर महानगरपालिका बाजारातिल जागा विशिष्ट व्यक्तीस किंवा कंम्पनीस वापर करण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 332 (ब) व (क) अन्वये स्थायी समितीच्या मान्यतेस देणे अभिप्रेत आहे. नागपूर महानगरपालिका बाजार विभागाचे नागपूर शहरामध्ये वेगवेगळया ठिकाणी बाजाराचे इमारती असून बाजाराची यादी नस्तीच्या उजव्या बाजूस टांचण आहे.

मा. अप्पर आयुक्त (III), म.न.पा. यांचे निर्देशाप्रमाणे प्रायोजीक तत्वावर दोन बाजारांमध्ये (नेताजी मार्केट व मंगळवारी कॉम्पलेक्स) मशीन लावण्याची परवानगी देणे योग्य राहील. या मार्केटमध्ये येणाऱ्या ग्राहकांच्या प्रतिक्रिया विचारात घेतल्यानंतर इतर मार्केटबाबत निर्णय घेणे योग्य राहील. यावर मा. आयुक्त, म.न.पा. यांची दि. 07/02/2018 रोजी मंजूरी प्राप्त आहे.

सदरहु जागा अर्जदारास किंवा कंम्पनीस दयावयाची झाल्यास एका जागेची महाराष्ट्र शासन यांच्या चालु वर्षाच्या सिध्द शिघ्र गाणकानुसार दर काढुन महिन्याप्रमाणे किराया दर ठरविणे योग्य राहील. तरी जागेची मागणी 3 X 3 = 9 चौ.फुट (1.00 चौ.मी.) होत असून सिध्द शिघ्र गणकानुसार दर माहेप्रमाणे शुल्क/भाडे आकारण्यात येईल. तरी नागपूर महानगरपालिका बाजार विभागा अंतर्गत येत असलेल्या नेताजी मार्केट आणि मंगळवारी कॉम्पलेक्स येथे प्रायोजिक तत्वावर जिथे जागा उपलब्ध राहील त्या स्थळी जागा देण्यात येईल. तसेच

ग्राहकांच्या प्रतिक्रीया विचारात घेतल्यानंतर इतर बाजारांमध्ये जागा देण्याचा निर्णय घेण्यात येईल. बाजार विभागाच्या परवान्यावर देण्यात आलेल्या जागेचे अटी व शर्ती कंपनीस बंधनकारक राहील करीता 11 महिन्याच्या अस्थाई परवान्यावर जागा देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 532:—** प्रभाग क्र. 10 (क) मधील पटेल नगर व फागो ले—आऊट **{हॉट मिक्स प्लॉन्ट}** येथे रस्त्याचे डांबरीकरण करण्यास्तव रु. 34,70,910/— रकमेच्या प्राकलनास मंजूरी प्रदान करून हे काम हॉट मिक्स प्लॉन्ट विभागा मार्फत निविदा काढून करून घेण्यास मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन निविदा काढण्यात येऊ नये. विभागाद्वारे हे काम तातडीने करावे या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 533:—** महाराष्ट्र महानगरपालिका हिवताप व हत्तीरोग विभाग तर्फे **{हिवताप व हत्तीरोग विभाग}** राबविण्यात येत असलेल्या योजनेमध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ४५८ (१९) च्या अनुषंगाने उपविधी तयार करण्यात आलेली आहे.

सबब या नियमावलीस मान्यता देण्याचा प्रश्न विचारात घेऊन म.न.पा. सभागृहाकडे अंतिम मंजूरीकरीता पाठविण्याचा प्रश्न विचारात घेऊन,

१. प्रारूप उपविधि परिशिष्ठ ''अ'' संलग्न.

परिशिष्ट ''अ''

महाराष्ट्र महानगरपालिका कार्पोरेशन कलम १९४९ धारा ४५८ (१९) अंतर्गत किटकजन्य आजार जसे हिवताप, डेंग्यु, चिकुनगुनिया चा प्रसार रोखण्याकरीता प्रस्ताव.

महाराष्ट्र महानगरपालिका कायदा कलम ४५८ (१९) तरतुदी अंतर्गत कायदेतील इतर तरतुदीबाबत मनपाने किटकजन्य आजार व इतर यावर नियंत्रण व रोखथाम करण्याकरीता उपविधी तयार करण्याचे योजिलेले आहे त्याचे अधिनियम खालीलप्रमाणे आहे.

१. या उपविधी अंतर्गत स्वच्छता व किटकजन्य आजारावर नियंत्रण करणे योग्य होईल.

२. या आधिनियमाअंतर्गत खालील गोष्टींचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

अ) कोणतेही छोटे पुल, पाण्याची टंकी, खड्डे, टाके, विहीरी, डबके, नाली कुठलाही पाण्याचा स्त्रोत किंवा साचलेले पाणी.

ब) पावसाळाया मध्ये घराच्या किंवा घराच्या बाहेर पाणी साचणारे वस्तु किंवा भाग कोणतेही जागेत जिथे पाणी जमा होऊ शकते.

क) नियम ४० कलम २ अंतर्गत आयुक्ताचा म्हणण्यानुसार जे ठिकाण व ठिकाणाचा काही भाग जो वापरित आहे किंवा मोकळा आहे जिथे बांधकाम सुरू आहे किंवा पुर्नबांधकाम सुरू आहे, किंवा बांधकाम पडलेले आहे, जिथे मच्छराची पैदास होऊ शकते, किंवा जनतेसाठी त्रासदायक ठरू शकते.

३. मा.आयुक्तांनी दिलेल्या लेखी नोटीसच्या माध्यमातुन जी व्यक्ती किटकजन्य आजार पसरविण्यासाठी जबाबदार असेल ती व्यक्ती त्या घरात राहणाऱ्या किंवा किरायदार किंवा घरमालक असेल तर त्यांनी मा.आयुक्तांनी लेखी नोटीस द्वारे दिलेल्या वेळेच्या आत दिलेल्या सुचनेनुसार त्या घरातील आजार फैलविण्यासाठी जबाबदार असणाऱ्याला नोटीस देऊ शकतो.

४. मा.आयुक्त च्या माध्यमातुन जी व्यक्ती मग ती त्या घरी राहणारी किंवा भाडेकरू किंवा घर मालक किंवा त्या घरी राहणारा इतर एक व्यक्ती किंवा अनेक व्यक्ती

जी किटकजन्य आजार पसरविण्यासाठी जबाबदार राहिल तो किटकजन्य आजार दुर करण्याकरीता किंवा नष्ट करण्यासाठी उपाययोजना करण्यात यावी.
नोटीस दिलेल्या दिवसापासुन जर ज्या व्यक्तीला तो नोटीस देण्यात आले त्यांना जर नोटीस मध्ये दिलेल्या नियमांचा भंग केल्यास त्यावर दुसरा नोटीस देण्याचा आत दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

५. जिथे बांधकाम सुरू आहे, पुर्ण झाले आहे, किंवा परत सुरू करण्यात आले आहे, किंवा पाडण्यात आलेले आहे अश्या भागाला किंवा अशा काही भागांमध्ये एखदया व्यक्तीवर किंवा अनेक व्यक्तीला उपविधी (३) अंतर्गत आयुक्त नोटीस देऊ शकतात तसेच घराचा रचनाकार नकाशा बनविणारा ठेकेदार किंवा घराच्या बांधकामात मदत करणारे ठेकेदार किंवा त्यांनी नेमलेली ती व्यक्ती किंवा इतर व्यक्ती नियमांचा भंग करू शकतात, केला किंवा करतील. त्याचावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

६. मा.आयुक्त अशा घरातील एक किंवा अनेक व्यक्ती जे घरमालक आहेत किंवा भाडेकरू किंवा त्या घरात राहणारे व्यक्ती. जे मनपा कर्मचाऱ्यांना घराचे छत पाहण्यासाठी सीढी देतील पण त्या छतावर जर डासोत्पत्ती स्थाने आढळली तर नोटीस देऊ शकतात.
ज्या व्यक्ती घरमालक भाडेकरू किंवा त्या घरात राहणारे व्यक्ती त्याचा घराच्या छतावर डासोत्पत्ती स्थाने आढळतील त्यांना नोटीस देऊ शकतात.

७. मा.आयुक्तांना मिळालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जर उपनियम २ व ३ च्या अनुषंगाने विहीर जर भरलेली असेल किंवा झाकुन ठेवलेली असेल व त्याबाबत कोणीही लेखी तक्रार नोंदविली तर त्या तक्रारीबाबत स्थायी समितीला मा.आयुक्त कळवू शकतात आणि याबाबत मा.आयुक्त पुन्हा चौकशी करू शकतात. स्थायी समितीच्या परवानगी शिवाय कलम ४८१ अंतर्गत कोणतीही कार्यवाही करू शकत नाही. कलम ४७९ अंतर्गत तक्रार अतिशय महत्वाची असल्यास त्या विरूध्द कार्यवाही करू शकतात. स्थायी समितीने विचारलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने जर ती विहीर झाकलेली असेल पुर्ण भरलेली असेल किंवा मच्छरांची पैदास होत नसेल तर त्यावर कुठल्याही प्रकारची कार्यवाही करण्यात येणार नाही. परंतू मा. आयुक्तांना सर्व निर्णय स्थायी समितीच्या परवानगीनेच घ्यावे लागतील. तसेच वरिल मच्छरांना नष्ट करण्यासाठी केलेला कामाचा दंड त्यासाठी जबाबदार व्यक्ती कडुन घ्यावा किंवा मनपा फंडातुन वसूल करावा किंवा त्यातील काही दंड मनपा फंडातुन मिळेल हा निर्णयही स्थायी समिती माध्यमातुन घेण्यात येईल.

८. या अधिनियमाअंतर्गत दंडात्मक कार्यवाही खालील तख्त्यानुसार करावी.
अ) घरगुती वापराच्या जागेसाठी प्रारंभिक दंड १०० रू. व २० रू. प्रत्येक दिवशी.
ब) व्यावसायीक वापरायच्या जागेसाठी प्रारंभिक दंड ५०० रू.व १०० रू.प्रत्येक दिवशी.
क) रूग्णालय व चिकीत्सालय प्रारंभिक दंड ५०० रू. व २०० रू. प्रत्येक दिवशी.
ड) शैक्षणीक संस्थेसाठी प्रारंभिक दंड ५०० रू. व २०० रू. प्रत्येक दिवशी.

९. जर वरील दंड न भरल्यास महाराष्ट्र महानगरपालिका नियमानुसार कलम ४३९ अंतर्गत तो दंड वसूल केल्या जाईल.

१०. रहिवासी प्रकारामध्ये डासअळी आढळल्यास त्याच वेळी रू.१००/— दंड आकारण्यात येईल व नंतर फेरतपासणी मध्ये रू.२०/— या प्रमाणे दर दिवशी दंड आकारण्यात येईल.

११. व्यवसायीक ठिकाणी डासअळी आढळल्यास त्याच वेळी रू.५००/— दंड आकारण्यात येईल व नंतर फेरतपासणी मध्ये रू.१००/— या प्रमाणे दर दिवशी दंड आकारण्यात येईल.

१२. दवाखाने, संस्था, शासकिय कार्यालय, शाळा—कॉलेजेस इत्यादी ठिकाणी डासअळी आढळल्यास त्याच वेळी रू.५००/— दंड आकारण्यात येईल व नंतर फेरतपासणी मध्ये रू.२००/— या प्रमाणे दर दिवशी दंड आकारण्यात येईल.
दंडात्मक कार्यवाही करतांना दंड वसूल करावयाचे रक्कमेचे तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | प्रकार | त्वरित दंड | दर दिवसाला दंड |
|---|---|---|---|
| १ | रहिवाशी | रू.१००/— प्रमाणे | दर दिवसाला रू.२०/— प्रमाणे |
| २ | व्यवसायीक | रू.५००/— प्रमाणे | दर दिवसाला रू.१००/— प्रमाणे |
| ३ | रूग्णालय, संस्था, शासकिय कार्यालय, शाळा, कॉलेजेस | रू.५००/— प्रमाणे | दर दिवसाला रू.२००/— प्रमाणे |

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन एकमताने मंजूरी प्रदान करण्यात येते व अंतिम मंजुरीकरिता मनपा सभागृहाकडे पाठविण्याची शिफारस करण्यात येते. यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>**ठराव क्रमांक 534**</u>:— प्रभाग क्र. २४ ड ढोबळे लेआऊट लता मंगेशकर येथे
**{लोककर्म झोन 08}** सिमेंन्ट रोडचे बांधकाम करण्यास्तव प्राप्त निविदाकार मे. दिप कंन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा १४.०० टक्के कमी दराची रू. ३२,९३,३३०/— रकमेची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>**ठराव क्रमांक 535**</u>:— प्रभाग क्र. १९ अ येथील संत्रा मार्केट बजरिया कृष्णा
**{लोककर्म झोन 06}** टॉकीज पासून ते मनीलाल ॲन्ड कंपनी पर्यंत सिमेंट कॉक्रीट रस्त्याचे बांधकामास्तव तयार केलेल्या रू.३१,४६,२८५/— रकमेच्या प्राकलनास पद क्र. A22001330802 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>**ठराव क्रमांक 536**</u>:— प्रभाग क्र. २५ ब भांडेवाडी, पारडी येथील श्री गांडवे
**{लोककर्म झोन 08}** यांचे घरापासून ते दुर्गा मंदीर पर्यंत रस्त्यांचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त 2 निविदांपैकी मे. डी.सी. गुरूबक्षाणी यांची प्राकलनिय दरांची रू.४९,९९,४२४/— रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>**ठराव क्रमांक 537**</u>:— कार्यादेश क्र. 118/RD दि. २१.११.२०१६ नुसार मे.
**{लोककर्म झोन 10}** प्रेमचंद राचूमल यांना देण्यात आलेले जूना प्रभाग क्र. २२ (ब) येथील टी. व्ही. टॉवर चौक ते डब्लू सी. एल. पर्यंत रस्त्याचे रूंदीकरण व डांबरकरणाचे उर्वरीत कामाचा मौका बदल करून त्याच प्रभागात सदर जवळील परीसराजवळ करण्याकरीता मौका बदलविण्या बाबतचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>**ठराव क्रमांक 538**</u>:— प्रभाग क्र. 33 (अ), कुकडे लेआऊट येथील प्रस्तावित
**{उद्यान विभाग}** उद्यानात विविध विकास कामा करिता रू 34,11,456/— रकमेच्या कामास स्थायी समिती ठराव क्र. 261 दि. 29/11/2017 अन्वये प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आली असून त्या अनुषंगाने विविध कामांच्या निविदा मागविल्या असता प्राप्त निम्मतम निविदा खालील प्रमाणे आहेत.

| अ. क्र | कामाचे नाव | निविदाकाराचे नाव | टक्के कमी/जास्त दर | निविदा राशी |
|---|---|---|---|---|
| 1 | विविध स्थापत्य कामे | मे. सचिन शाहू | 10% कमी | रू. 1140038/– |
| 2 | खेळणी बसविणे | मे. मल्टीपल सोल्यूशन | 11% कमी | रू. 165362/– |
| 3 | ग्रिन जिम बसविणे | मे. मल्टीपल सोल्यूशन | 7.90% कमी | रू. 425693/– |
| 4 | हिरवळीची कामे | मे. विदर्भ इन्व्हॉरमेंटल सर्व्हिसेस | 3.90% कमी | रू. 1246167/– |
| | | | **एकूण रू :** | रू. 29,77,260/– |

प्राप्त वरिल प्रमाणे एकत्रित राशी रू 29,77,260/–च्या निम्मतम निविदांना मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 539:–** **{लोककर्म झोन 04}** प्रभाग क्र. ३३ ब अंतर्गत वेस्ट बालाजी नगर येथील श्री. सुधिर फडणवीस ते श्री. रपटे व पोलीस चौकी समोरील रस्त्याचे सिमेंटीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त एकूण 4 निविदापैकी निम्नतम निविदाकार मे. एन.एन. बेलखोडे हयांची मूळ प्राकलनीय दरांपेक्षा 14.86 टक्के कमी दराची निविदा रु. 42,10,552/– स्विकृत करण्याचा प्रश्न विचारात तसेच हे काम पद क्र. (679) ए42001470511 अंतर्गत प्रस्तावित आहे. तरतूद मुक्त करण्याच्या मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 540:–** **{प्रकल्प विभाग}** सन 1857 प्रथम स्वतंत्रता संग्राम 150 वी वर्षगांठ निमित्त गांधीबाग बगीचा येथे स्मारक निर्मिती अनुषंगाने बांधकामामधे बदल होत असल्याने अतिरिक्त काम करणे आवश्यक असल्याने सन 2012–2012 च्या दरावर आधारीत सुधारीत प्राकलन रू. 17425609/– ला प्रशासकिय मान्यता प्रदान करणे तसेच रू. 4867277/– वाढीव खर्चास पद क्र. A46701373519 अंतर्गत मान्यता प्रदान करणे व या कामाचे कंत्राटदार मे . एस.जे.शर्मा यांना वाढीव कामाकरीता जुन्याच मंजूर दरावर प्राकलनिय दरापेक्षा 0.51 टक्के कमी दराने काम करण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 541:–** **{लोककर्म झोन 05}** प्रभाग क्र. 27 – ब येथील लक्ष्मीनारायण मंदीर ते म.न.पा. शाळा कॅनल रोड ते हसनबाग रोडचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रूपये 38,66,190/– च्या प्राकलनास प्रशासकिय मान्यता व निविदा मागविण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 542:–** **{उद्यान विभाग}** प्रभाग क्र. 16 (ड), हिंदुस्तान कॉलनी येथे डॉ. जगदीशचंद्र बोस, बॉटनीकल व सायंन्स टेक्नॉलॉजी पार्क ची निर्मीती करणे या कामा करिता रू 49,88,063/– रकमेच्या कामास स्थायी समिती ठराव क्र. 291 दि. 11/12/2017 अन्वये प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आली असून त्या अनुषंगाने या कामाची निविदा मागविली असता प्राप्त निम्मतम निविदाकार मे. श्री. हिमालया प्लॅन्टेशन यांची राशी रू 48,88,801/–च्या निम्मतम निविदेला मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 543:–** **{लोककर्म झोन 09}** प्रभाग क्र. 7 (ब) अंतर्गत आनंद बुध्द विहार ते सरदार भाई यांचे घरापर्यंत रोडचे सिमेंटकरण करण्यास्तव प्राप्त तीन निविदांपैकी मे. सय्यद नाझीम अली यांची मुळ प्राकलनीय राशी रु. 47,62,421/– पेक्षा 14.24 टक्के कमी दराची रू. 40,84,252/– (रूपये चाळीस लक्ष चौ–यान्शी हजार दोनशे बावन) ची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न विचारात घेऊन तसेच हे काम पद क्र. 679 (A42001470511)

अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 544:—** {लोककर्म झोन 05} प्रभाग क्र. २८ ब अंतर्गत सर्वश्रीनगर येथील नाल्याच्या (आर.सी.सी.) भिंतीचे बांधकाम करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई—निविदातील प्राप्त एकूण पाच निविदाकाराची निविदांपैकी मे. राजेश रंगारी यांची प्राक्कलनीय दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. 27,63,351/— रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 545:—** {लोककर्म झोन 09} प्रभाग क्र. 3 (ड) अंतर्गत गरीब नवाज नगर येथील नाल्याच्या भिंतीचे बांधकाम करण्यास्तव प्राप्त तीन निविदांपैकी मे. एन.एन. बेलखुडे यांची मुळ प्राकलनीय राशी रु. 79,99,894/— पेक्षा 17.12 टक्के कमी दराची रू. 66,30,312/— (रूपये सहासट लक्ष तीस हजार तीनशे बारा) ची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न विचारात घेऊन तसेच हे काम पद क्र. 618 (A43901370812) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 546:—** {लोककर्म झोन 02} प्रभाग क्र. 15 — सी येथील कुसुमताई वानखेडे हॉल जवळील नागनदीवरील पूलाच्या बांधकामाकरिता निम्नतम निविदाकार मे. ब्रिजेश मिश्रा यांची रु. 33,78,008/— ची प्राकलनीय दरांपेक्षा 10.97 टक्के प्रतिशतने कमी असलेली निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 547:—** {वाहतूक विभाग} महानगरपालिका ठराव क्र. 692 अंतर्गत नागपूर शहरात शहर बस मार्गावर बांधा वापरा आणि हस्तांतरीत करा (BOT) या तत्वावर 10 वर्षा करीता ॲडव्हरटायझींग राईट ग्रुप क्र. 1 ते ग्रुप क्र. 5 अंतर्गत मे. साईन पोस्ट इंडिया प्रा.ली. (पूर्वीचे ग्रीनथंब इन्नोवेटर प्रा.ली.) या कंत्राटदारांनी एकूण 158 बस स्टॅापची सन 2011 मध्ये उभारणी केली. सदर कंत्राटदार वार्षीक रॉयल्टी 23 लक्ष 18 हजार रूपये वेळोवेळी म.न.पा. मध्ये भरणा करीत आहे.

मे. साईन पोस्ट इंडिया प्रा.ली. (पूर्वीचे ग्रीनथंब इन्नोवेटर प्रा.ली.) यांचा अस्तीत्वातील जुने बस स्टॅाप काढणे आणि त्या ठिकाणी नवीन बस स्टॅापची उभारणी करण्याचा प्रस्ताव दि. 16.08.2016 रोजी प्राप्त.

1) वरील ग्रुप क्र. 1 ते ग्रुप क्र. 5 अंतर्गत मे. साईन पोस्ट इंडिया प्रा.ली. (पूर्वीचे ग्रीनथंब इन्नोवेटर प्रा.ली.) यांच्या मार्फत उभारण्यात आलेले बस स्टॅाप ठराव क्र. 93 अन्वये दि. 19/06/2015 नुसार नवीन मान्यता प्राप्त बस स्टॅापच्या डिझाईन प्रमाणे आणि दिल्ली व बंगलोर ठिकाणी लावण्यात आलेल्या आणि नागपूर शहर हे ‘‘स्मार्ट सिटी’’ करण्याच्या उद्देशाने तसेच नागपूर शहर सौंदर्यीकरण करण्याच्या दृष्टिने आणि शहरातील दर्शनी भागात समांतर बस स्टॅाप उभारण्याकरीता अस्तीत्वातील जुने बस स्टॅाप काढणे आणि त्या ठिकाणी नवीन बस स्टॅापची उभारणी करणे.

मान्यता प्राप्त डिझाईन प्रमाणे नविन बस स्टॅाप उभारण्याकरीता लागणारा अंदाजीत खर्च 5.85 लक्ष रूपये प्रति बस स्टॅाप इतका येत आहे. परंतु वरील कंपनी हा सर्व खर्च वहन करणार असून, ही कंपनी नवीन बस शेल्टरची रॉयल्टी भरण्यास देखील तयार आहे. मे. साईन पोस्ट इंडिया प्रा.ली. यांना अस्तीत्वातील जुने बस स्टॅाप काढणे आणि त्या ठिकाणी नवीन बस स्टॅापची उभारणी करण्याकरीता मान्यता देण्यास,

2) अस्तित्वातील जुने बस शेल्टर काढण्यात आल्यानंतर त्यांना शहरातील आतील भागात आणि नागपूर शहराच्या वेशीवर (Out Skirt), महानगरपालिकेच्या हद्दीत कमी जागा उपलब्ध असलेल्या आवश्यक त्या ठिकाणी बस मार्गांवर पुर्नस्थापित करण्याचे/बसविण्याचे प्रस्तावीत आहे.

पुर्नस्थापित करण्याचा खर्च प्रति बस स्टॉप रू. 1.45 लक्ष देखील मेसर्स साईन पोस्ट इंडिया प्रा.ली. कंपनी वहन करणार आहे. याची रॉयल्टी देखील वरील कंपनी म.न.पा. मध्ये वेळोवेळी भरणार आहे. वरील प्रमाणे आवश्यक त्या ठिकाणी अस्तित्वातील बस स्टॉप पुर्नस्थापीत करण्यास मे. साईन पोस्ट इंडिया प्रा.ली. यांना मान्यता देण्यास,

3) वरील कामाकरीता लागणारा अंदाजीत खर्च 11 कोटी 53 लक्ष येणार असून (हि रक्कम मे. साईन पोस्ट, इं.प्रा.ली. खर्च करण्यास तयार आहे.) हा खर्च रॉयल्टी मध्ये समायोजीत केल्यास समायोजीत करण्याचा अंदाजीत कालावधी करीता कंत्राट 32 ते 33 वर्ष इतका वाढत आहे. परंतु मे. साईन पोस्ट, इं. प्रा.ली. यांनी फक्त वाढीव कालावधी 10 वर्ष इतकाच मागितला आहे. सदर कालावधी करारनामाचे दिनांकापासून नविन बस स्टॉप लावण्याचा आणि जुने बस स्टॉप पुर्नस्थापित करण्याचा 6 महिन्याचा कालावधी वगळून पूढे अंमलात येईल. वाढीव कालावधीला मान्यता दिल्यास म.न.पा. ला दर वर्षी पुर्नस्थापित बस स्टॉपची रॉयल्टी 14 हजार 600 प्रति बस स्टॉप या प्रमाणे 23 लक्ष 18 हजार मिळणार आहे. तसेच नविन डिझाईन प्रमाणे लावण्यात आलेल्या बस स्टॉप ची देखील रॉयल्टी प्रति बस स्टॉप 14 हजार 600 प्रति बस स्टॉप या प्रमाणे 158 बस स्टॉप करिता 23 लक्ष 18 हजार इतकी वाढिव मिळणार असून या नविन डिझाईन प्रमाणे लावण्यात आलेल्या 158 बस स्टॉपच्या रॉयल्टी दरा मध्ये दर 3 वर्षांनी 10 टक्के वाढीसह प्रस्तावास मान्यता देण्यास

वरीलप्रमाणे 1, 2 व 3 प्रस्तावास मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन सध्या वाढीव कालावधी 5 वर्षाकरिता वाढविण्यात येतो. वाढीव कालावधी संपुष्टात आल्यावर स्थायी समितीची पुढील 5 वर्षाकरिता रितसर मंजुरी घ्यावी या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 548</u>:— {लोककर्म झोन 06} प्रभाग क्र. 18 अ,ब,क येथे श्री बांगरे यांचे घरापासून ते नवप्रतिभा हायस्कुल पर्यंत सिमेंट कॉक्रींट रस्त्याचे बांधकामास्तव तयार केलेल्या रू. ४४,४७,१७३/— रकमेच्या प्राकलनास जूने पद क्र. ६८२ Fixed Priority व नविन पद क्र. A22001330803 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन लघुनिविदा काढण्याच्या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 549</u>:— {लोककर्म झोन 08} प्रभाग क्र. २४ ब डिप्टी सिग्नल साखरकरवाडी येथे श्री. मो. अनवर ते श्री. येरणे आणि श्री. मनिष कौसल ते श्री. उराडे यांचे घरापर्यंत सिमेंन्ट रोडचे बांधकाम करण्यास्तव प्राप्त निविदाकार मे. व्हि. एफ. दढारे यांची प्राकलनीय दरापेक्षा १४.५५ टक्के कमी दराची रू. २६,८९,०३८/— रकमेची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 550</u>:— {लोककर्म झोन 08} प्रभाग क्र. 23 क शास्त्रीनगर येथे 1) श्री चकोले ते श्री पटकोटवार व 2) श्री निमजे ते श्री सोरते यांचे घरापर्यंत सिमेंट कॉक्रीट रस्त्याचे बांधकाम करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदाकार मे. उल्हास इंटरप्रायजेस यांची प्राकलनीय दरा पेक्षा 13.42 टक्के कमी दराची रु. 26,85,725/— राशीची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 551</u>:— {लोककर्म झोन 08} प्रभाग क्र. २४ क जलाराम नगर येथे सिमेंन्ट रोडचे बांधकाम करण्यास्तव प्राप्त निविदाकार मे. दिप कंन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा १४.०० टक्के कमी दराची रू. ३९,३१,९९८/— रकमेची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 552</u>:— {उद्यान विभाग} प्रभाग क्र. 36 (ड), खामला पांडे लेआऊट येथील उद्यानात विविध कामे करण्याचे रू. 39,10,490/—(एकोणचाळीस लक्ष

दहा हजार चारशे नव्वद फक्त) रकमेच्या प्राकलनास मान्यता प्रदान करण्यास तसेच या कामास्तव निविदा मागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 553:—** **{स्लम विभाग}** प्रभाग क्र. 18 'अ' अंतर्गत महाल, शिगाडा मार्केट येथे संरक्षण भिंतीचे बांधकाम करण्यास्तव प्राप्त एकुण 04 निविदापैकी निम्नतम निविदाकार मे. व्ही. एच. मुधोळकर यांची प्राकलनीय दरापेक्षा 10.21 टक्के कमीवर असलेली रूपये 25,21,666/— (रूपये पंचवीस लक्ष, एकवीस हजार सहाशे सहासष्ठ फक्त) ची सुधारित दराची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 554:—** **{स्लम विभाग}** प्रभाग क्र. 38 'ब' अंतर्गत मौजा टाकळी सिम गांव येथे सिमेंट कॉंक्रीट रोडचे बांधकाम करण्यास्तव प्राप्त एकुण 03 निविदापैकी निम्नतम निविदाकार मे. सायली कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा 15.85 टक्के कमीवर असलेली रूपये 25,18,521/— (रूपये पंचवीस लक्ष, अठरा हजार पाचशे एकवीस फक्त) ची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा तसेच आयव्यय पद क्र. A42001374602 अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 555:—** **{शिक्षण विभाग}** नागपूर महानगरपालिकेची वांजरी हिंदी उच्च प्राथ. शाळा शिर्केनगर स्थित श्री. मनोहर गुलाबराव शिर्के यांच्या इमारतीत भरत होती. इमारतीची अवस्था अत्यंत जीर्ण झाल्याने कुठलीही दुर्घटना घडून विद्यार्थ्यांच्या जिवीताला धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने तसेच त्या परिसरात जवळपास मनपाची कुठलीही इमारत नसल्याने शाळा बंद होऊ नये याकरिता त्याच घरमालकाच्या जुन्या शाळा इमारती जवळ असलेल्या नवीन सुसज्ज इमारतीत शाळा व्यवस्थापन समितीद्वारे दि. 05.06. 2015 रोजी ठराव पारित करुन शाळा नवीन इमारतीत स्थानांतरीत करण्यात आली. परंतु शाळा स्थानांतरणाकरिता सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेण्यात आली नाही. परंतु ज्या तारखेपासुन नवीन इमारतीत शाळा स्थानांतरीत करण्यात आली आहे. त्या तारखेपासुन इमारत मालकास निर्धारित करण्यात आलेल्या किरायानुसार भाडे देणे आहे.

नगररचना विभागातर्फे नवीन इमारतीचे 04 वर्गखोल्याचे दरमहा रु. 20,203/— भाडे निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार दि. 01.07.2015 पासुन पुढील पाच वर्षाकरिता म्हणजेच दि. 30.06.2020 पावेतो नगररचना विभागातर्फे निश्चित करण्यात आलेल्या प्रतिमाह किराया रु. 20,203/— नुसार मुदत वाढीचा तसेच दि. 01.07.2015 पासून मार्च 2018 पावेतो थकीत किरायाच्या रक्कमेस व शाळा स्थानांतरित करण्याच्या कार्योत्तर मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 556:—** **{लोककर्म झोन 01}** प्रभाग क्र. 16 'ड' अंतर्गत पश्चिम लक्ष्मीनगर मधील रस्त्यांचे रूंदीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रूपये 4989180/—(रूपये एकोनपन्नास लक्ष, एकोनव्वद हजार एकशे अंशी फक्त) रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी करण्याचा तसेच पद क्र. A22001330803 अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 557:—** **{लोककर्म झोन 09}** प्रभाग क्र. 3 (क) अंतर्गत पिवळी नदी हमीद नगर (मॉ बम्लेश्वरीनगर) येथे सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे बांधकाम करण्यास्तव प्राप्त एकूण 5 निविदापैकी मे. एन.एन.बेलखुडे यांची प्राकलनीय रशी. रु. 49,99,983/— पेक्षा 12.19 टक्के कमी दराची रू. 43,90,485/— (त्रेचाळीस लक्ष नव्वद हजार चारशे पंच्यांशी) ची निविदेस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 558</u>:— प्रभाग क्र. 3 (ब) अंतर्गत प्रवेश नगर येथे सिमेंट कॉक्रीट **{लोककर्म झोन 09}** रोडचे व ड्रेन लाईनचे बांधकाम करण्याच्या कामाकरिता प्राप्त एकूण 4 निविदापैकी मे. उल्हास इन्टरप्राजेस यांची प्राकलनीय रशी. रु. 39,98,769/— पेक्षा 16.91 टक्के कमी दराची रू. 33,22,577/— (तेत्तीस लक्ष बावीस हजार पॉचशे सत्यातर) ची निविदेस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 559</u>:— श्री. संजय हरिभाऊ कापगते यांना अग्निशमन सेवा शौर्यपदक **{अग्निशमन विभाग}** (Fire Service Medal for Gallentry) मिळाले असल्याने त्यांना सुधारित अनुज्ञेय भत्ता लागू करणेबाबत.

श्री. संजय हरिभाऊ कापगते हे अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागात आग्निक पदावर सन 2004 साली रूजू झाले. दि. 02 जून, 2009 रोजी हुडकेश्वर रोड, नागपूर येथे विहिरीत पडलेल्या 2 मजूरांना स्वतःचा जीव धोक्यात घालून व शौर्य दाखवून वाचविण्याचा प्रयत्न केल्याबाबत महामहीम मा. राष्ट्रपतींनी दि. 15 ऑगष्ट, 2010 ला अग्निशमन सेवा शौर्यपदक (Fire Service Medal for Gallentry) पदक घोषित करण्यात आले.

अशाप्रकारचे शौर्यपदकाबाबत केंद्र शासनाचे खालीलप्रमाणे सुधारित अनुज्ञेय भत्ते आहेत. As per the Existing Sub-Rule(a) of Rule (5), Substitute the following :

| Sr. No. | Name of the medals | Mandalay-allowance attached with medal | |
|---|---|---|---|
| | | Exixting Rate Per Month | Revised Rate Per Month notification from dt. 15th July, 2009 |
| 1 | President's Fire Service Medal for Gallantry | Rs. 750 | Rs. 1500 |
| 2 | Fire Service Medal for Gallantry | Rs. 450 | Rs. 900 |

| Sr. No. | Name of the medals | Mandalay-allowance attached with medal | |
|---|---|---|---|
| | | Exixting Rate Per Month | Revised Rate Per Month notification from dt. 25th March, 2015 |
| 1 | President's Fire Service Medal for Gallantry | Rs. 1500 | Rs. 3000 |
| 2 | Fire Service Medal for Gallantry | Rs. 900 | Rs. 2000 |

करीता श्री. संजय हरिभाऊ कापगते, (सध्या कार्यरत आरोग्य विभाग, फुड इन्स्पेक्टर) यांना अग्निशमन सेवा शौर्यपदक (Fire Service Medal for Gallentry) पदक दि. 15 ऑगष्ट, 2010 ला मिळाले असल्याने त्या पदकाला शासनाचे नियमानुसार अनुज्ञेय असलेला भत्ता दिनांक 15 ऑगष्ट, 2010 ते दि. 24 मार्च 2015 पर्यंत प्रति माह रू. 900 व दि. 25 मार्च, 2015 पासून प्रति माह रू. 2000 अनुज्ञेय भत्ता लागू करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 560</u>:— प्रभाग क्र. २५ ब शिवनगर, भांडेवाडी येथील रस्त्यांचे {लोककर्म झोन 08} डांबरीकरण करण्यास्तव प्राप्त निविदाकार मे. प्रेम साई कंन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा ०.९९९ टक्के कमी दराची रू. ४३,३७,८४०/— रकमेची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 561</u>:— प्रभाग क्र. ३ (ड) अंतर्गत पांडे वस्ती येथील नुरी मस्जिद {लोककर्म झोन 09} पासुन ते श्री. गुप्ताचे घरापर्यंत ड्रेन लाईन व सिमेंट कॉक्रीट रोडचे बांधकाम करण्यास्तव प्राप्त तीन निविदांपैकी मे. हितेश कन्स्ट्रक्शन यांची

मूळ प्राकलनीय राशी रु. ३६,२८,१२६/— पेक्षा ५.२५ टक्के कमी दराची रु. ३४,३७,६४९/— ची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच हे काम पद क्र. ६८१(ए२२००१३०८०२) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी सिमीत ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 562:—** {लोककर्म झोन 08} प्रभाग क्र. २५ ब श्री. हजारे ऑफीस ते श्री. रारोकर यांच्या घरापर्यंत विनोबा भावे नगर येथे सिमेंट कॉक्रीट रोड चे बांधकाम करण्यास्तव मे. दिप कंन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा १४.०६ टक्के कमी दराची रू. ४२४५३०४/— रकमेची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 563:—** {लोककर्म झोन 08} प्रभाग क्र. २५ ब श्री कुर्वे यांचे घरापासून ते खुशाल किराणा, अंम्बे नगर, भांडेवाडी येथील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त 3 निविदांपैकी मे. प्रेम साई कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनिय दरापेक्षा ०.९९९९ प्रतिशतने कमी दरांची रू.४४,२३,५३७/— रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 564:—** {लोककर्म झोन 05} प्रभाग क्र. ३० ड अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण, खडीकरण व फुटपाथचे बांधकाम करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई—निविदातील प्राप्त एकूण तिन निविदाकाराची निविदांपैकी मे. फोनिक्स इंजिनिअरिंग यांची प्राक्कलनीय दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. 39,76,422/— रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 565:—** प्रभाग क्र. ३८ ब अंतर्गत बजरंग नगर (आनंदनगर) {स्लम विभाग} येथील नाल्याच्या भिंतीचे बांधकाम करण्याचे कामास्तव प्राप्त एकूण ०६ निविदापैकी निम्नतम निविदाकार मे. ब्रजेश मिश्रा यांची प्राकलनीय दरापेक्षा १५.६३ टक्के कमीवर असलेली रुपये २७,९६,६९४/— ची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा तसेच आयव्यय पद क्र. ए४२००१३७४६१२ अंतर्गत तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 566:—** {लोककर्म झोन 05} प्रभाग क्र. २७ अ अंतर्गत वृंदावन नगर व सद्भावना नगर येथील रोडचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई—निविदातील प्राप्त एकूण पाच निविदाकाराची निविदांपैकी मे. एस. के.जी. असोसियटस यांची प्राकलनीय दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रु. ३२,७८,३३६/— रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 567:—** {लोककर्म झोन 03} प्रभाग क्र. ३२ (अ) अंतर्गत जवाहरनगर येथे सिमेंट कॉक्रिट रोडचे बांधकाम करण्यास्तव प्राप्त एकूण ३ निविदापैकी मे. विश्वदीप इंटरप्रायझेस यांची प्राकलनीय दरापेक्षा १६.६५% कमी दराची रू. ४१,३७,५६५/— रकमेची निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 568:—** {लोककर्म झोन 03} प्रभाग क्र. ३४ (ब) अंतर्गत विणकर कॉलोनी मानेवाडा चौक येथील सिमेंट कॉक्रिट रोडचे बांधकाम करण्याच्या कामास्तव प्राप्त एकूण तीन निविदारांपैकी मे. एन. एन. बेलखुडे यांची प्राकलनीय दरापेक्षा १७.०२ टक्के कमी दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. ४१,३५,०२३/— रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 569</u>:—** प्रभाग क्र. १५ (जुना ५२) येथील आशा मंगल कार्यालय
**{लोककर्म झोन 02}** धरमपेठ समोरील रस्त्याचे सिमेंटीकरण करण्याच्या कामाकरिता प्राप्त चार निविदांपैकी मे. विजय नायडू यांची जुन्या प्राकलनीय दरांपेक्षा २.७९ टक्के प्रतिशतने कमी असलेली रु. ६३,८८,१८३/— ची निम्नतम निविदा स्विकृत करण्य प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 570</u>:—** प्रभाग क्र. 16 'ब' अंतर्गत पावनभूमी, उज्जवल नगर, कर्वे
**{लोककर्म झोन 01}** नगर येथील मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रूपये 4979925/— (रूपये एकोनपन्नास लक्ष, एकोनअंशी हजार नऊशे पंचवीस फक्त) रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी करण्याचा तसेच पद क्र. A22001330801 अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 571</u>:—** प्रभाग क्र. 33 (अ) अंतर्गत न्यु कैलास नगर, श्रमजीवीनगर व
**{हॉट मिक्स प्लॉन्ट}** कुकडे ले आऊट येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्यास्तव रु. 30,87,166/— रकमेच्या प्राकलनास मंजूरी प्रदान करून हे काम हॉट मिक्स प्लॉन्ट मार्फत निविदा काढून करून घेण्यास मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन निविदा काढण्यात येऊ नये. विभागाद्वारे प्रस्तावित काम तातडीने करावे या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 572</u>:—** प्रभाग क्र. 16 'अ' अंतर्गत बजाज नगर, लक्ष्मीनगर येथील
**{लोककर्म झोन 01}** मुख्य आय.आर.डी.पी. रोडचे रूंदीकरण, डांबरीकरण व फुटपाथ बनविण्याच्या कामास्तव रूपये 4991977/— (रूपये एकोनपन्नास लक्ष, एक्यान्नव हजार नऊशे सत्यात्तर फक्त) रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी करण्याचा तसेच पद क्र. A22001330801 अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 573</u>:—** प्रभाग क्र. 16 'क' अंतर्गत अजनी आझाद चौक ते गजानन
**{लोककर्म झोन 01}** नगर टी—पॉईंट पर्यन्त आय.आर.डी.पी. रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रूपये 4990078/— (रूपये एकोनपन्नास लक्ष, नव्वद हजार अठ्यात्तर फक्त) रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी करण्याचा तसेच पद क्र. A22001330803 अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 574</u>:—** प्रभाग क्र. 2 (ड) अंतर्गत नारी गाव पिवळी नदीवरील
**{लोककर्म झोन 09}** ठिकठिकाणी संरक्षण भिंतीचे बांधकाम करण्यास्तव रु. 99,54,560/— रकमेच्या प्राकलनास मंजूरी प्रदान करून व निविदा मागविण्यास मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन लघुनिविदा काढण्याच्या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 575</u>:—** जकातीच्या जप्तीच्या मालाची विल्हेवाट लावण्याच्या
**{स्थानिक संस्था कर विभाग}** दृष्टीने ई—निविदा मागवून विक्री करणेबाबत.

जकातीच्या जप्तीच्या मालाची विल्हेवाट लावण्याच्या दृष्टीने निविदा मागवून विक्री करण्याबाबतच्या प्रस्तावास यापूर्वी मा. स्थायी समिती ठराव क्र. २५ दिनांक २९.०४.२०१७ अन्वये मंजूरी प्रदान करण्यात आलेली होती (नस्तीत पान क्र. ४८ वर ठराव प्रत संलग्न आहे). त्यानुसार विभागाव्दारे ई—निविदा मागविण्यात आलेली होती.

जकातीचा जप्ती केलेला माल हा बराच जूना असून सदर्हू निविदेस तीनवेळा मुदतवाढ देवूनही दोनच निविदाकारांनी यात भाग घेतलेला होता. तसेच विभागाने प्रस्तावित केलेल्या किंमतीपेक्षा निविदाकारांनी फारच कमी किंमत सादर केलेली आहे (गोषवारा नस्तीत पान क्र.३५७ वर संलग्न आहे). ज्या व्हॅल्युअर ने पूर्वी किंमत निश्चित केलेली होती त्यांनी सध्या स्थितीत बाजार भावाचा अंदाज घेवून, विभागाने निश्चित केलेल्या किंमतीच्या ३० प्रतिशत किंमत कमी करण्याचे सुचविले.(व्हॅल्युअर चे पत्र नस्तीच्या उजव्या बाजूस पान क्र.३५८ वर संलग्न आहे) त्यानुसार विभागाव्दारे खालील प्रमाणे मालाची ३० प्रतिशत किंमत कमी करुन फेर निविदा मागविण्याचे प्रस्तावित असून यास मा.स्थायी समितीची मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

30% Less of Estimated Cost

| Lot No. | विक्री करण्यात येत असलेल्या मालाचे वर्णन | Estimated Cost | 30% less |
|---|---|---|---|
| १. | Sports Goods | 75300.00 | 52710.00 |
| २. | Medical/surgical/scientific | 112042.00 | 78429.00 |
| ४. | General Goods/Cosmetics | 800795.00 | 560556.00 |
| ५. | Electrical goods | 719193.00 | 503435.00 |
| ६. | Electronic goods | 539695.00 | 377786.00 |
| ७. | Kitchenware goods | 430525.00 | 301367.00 |
| ८. | Ready-mades | 332990.00 | 233093.00 |
| ९. | Industrial/Engineering | 185880.00 | 130116.00 |
| १०. | Hardware/ Sanitary | 698480.00 | 488936.00 |
| ११. | Motor/Auto Parts | 853666.00 | 597566.00 |
| | **Total** | **5024286.00** | **3323994.00** |

**ठराव क्रमांक 576:—** {लोककर्म झोन 02} प्रभाग क्र. १२(डी) येथील गव्हर्नमेंट प्रेस सोसायटी, एअर फोर्स कॉलनी ठाकरे ले—आऊट येथील रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामाकरिता निम्नतम निविदाकार मे. एस.के. गुरुबक्षाणी यांची वाटाघाटी नंतरच्या जुन्या प्राकलनीय दरांपेक्षा ८.५ टक्के प्रतिशतने कमी म्हणजे रु. ३४,७९,०७९/— ची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 577:—** नागपुर शहरातील सिमेंट कॉक्रीट रस्ते टप्पा — III अंतर्गत, {कार्य. अभि. बांधकाम} पॅकेज क्र.— 5 अंतर्गतील 1) रस्ता क्र. 20 छोटा ताजबाग चौक ते तुकडोजी पुतळा ते वंजारी नगर पाण्याची टाकी पर्यंत. 2) रस्ता क्र. 23 मानेवाडा सिमेंट रोड, प्रथमेश अर्पाटमेंट ते अयोध्यानगर सिमेंन्ट रोड पर्यंत. रस्ता सिमेंट कॉक्रीटचा तयार करण्याकरीता रू. 20,30,29,352/— राशीचे कामास्तव मागविण्यात आलेल्या ई — निविदेतील निम्मतम निविदाकार में. खळतकर कन्स्ट्रक्शन कंपनी यांची प्राकलनीय दरांपेक्षा 0.75 टक्के अधिक दराची रू. 20,45,52,073/— रकमेची निम्नतम सुधारीत निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 578:—** {लोककर्म झोन 05} प्रभाग क्र. 26 — अ येथील न्यु सुरजनगर भागात पावसाळी पाण्याची R.C.C (N P III) पाईप लाईन चे काम करण्याच्या कामास्तव रूपये 35,86,480/— च्या प्राकलनास प्रशासकिय मान्यता प्रदान करणे व निविदा

मागविण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली

<u>ठराव क्रमांक 579</u>:— {लोककर्म कार्य. बांध.} नागपुर शहरातील सिमेंट कॉक्रीट रस्ते टप्पा — III अंतर्गत, पॅकेज क्र.— 7 अंतर्गतील 1) रस्ता क्र. 28 माऊंट रोड सालवे चौक ते आकाशवानी चोक ते महाराजबाग चौका पर्यंत. 2) रस्ता क्र. 29 सि.के. नायडू चौका पासून बिशॉप कॉटन शाळे पासून विधान सभा चौका पर्यंत. 3) रस्ता क्र. 30 पोलीस लाईन टाकळी फिडर रोड, अवस्थी नगर चौक ते पागलखाना चौका पर्यंत. रस्ता सिमेंट कॉक्रीट चा तयार करण्याकरीता रू. 29,01,72,105/— राशीचे कामास्तव मागविण्यात आलेल्या ई—निविदेतील निम्मतम निविदाकार में. अभि इंजिनिअरींग कार्पो. प्रा. लि. यांची प्राकलनीय दरांपेक्षा 4.44 टक्के कमी दराची रू. 27,72,88,463/— रकमेची निम्नतम निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 580</u>:— {लोककर्म कार्य. बांध.} नागपुर शहरातील सिमेंट कॉक्रीट रस्ते टप्पा — III अंतर्गत, पॅकेज क्र.— 1 अंतर्गतील 1) रस्ता क्र. 13 टेकानाका चौकापासून ते रिंग रोड ते नारी गावापर्यंत. 2) रस्ता क्र. 15 नारा घाट— कुशीनगर ते साई मंदिर रिंग रोड चौक 3)रस्ता क्र. 16 सिंधुनगर सोसायटी ते बॉम्बे स्कुटर ते एकता पॅलेस.4) रस्ता क्र. 17 महेन्दीबाग रोड— क्रॉडॅक रोड ते (मस्कासाथ चौक ते राऊत चौक) खैरीपुरा रेल्वे क्रासिंग ते कांजी हॉऊस चौक ते रिंग रोड (प्रथम भाग मध्य विधानसभा क्षेत्रात ) 5) रस्ता क्र. 18 बापुना वाईन शॉप ते गुरू नानक सोसायटी ते जी कुमार आरोग्य धाम. 6) रस्ता क्र. 19 कुकरेजा नगर — कस्तुरबा नगर गल्ली क्र. 1, 2, 3, 4 ते कस्तुरबा नगर झोपडपट्टी. रस्ता सिमेंट कॉक्रीट चा तयार करण्याकरीता रू. 25,74,24,091/— राशीचे कामास्तव मागविण्यात आलेल्या ई—निविदेतील निम्मतम निविदाकार में. डी. सी. गुरूबक्षानी, यांची प्राकलनीय दरांपेक्षा 2.66 टक्के कमी दराची रू. 25,05,85,621/— रकमेची निम्नतम निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 581</u>:— {कार्य. अभि. बांधकाम} नागपुर शहरातील सिमेंट कॉक्रीट रस्ते टप्पा — III अंतर्गत, पॅकेज क्र.— 4 अंतर्गतील 1)रस्ता क्र. 7 वर्धमान नगर चौक ते भंडारा रोड, विकास इंड्रस्टीज चौक ते डिप्टी. सिग्नल शितलामाता मंदिर चौका पर्यंत. 2) रस्ता क्र. 8 डिप्टी सिग्नल रेल्वे क्रॉसिंग ते कळमना मार्केट रोड पर्यंत. रस्ता सिमेंट कॉक्रीट चा तयार करण्याकरीता रू. 22,04,89,551/— राशीचे कामास्तव मागविण्यात आलेल्या ई — निविदेतील निम्मतम निविदाकार में. अभि. ईजिनिअरींग कार्पो. प्रा. लि. यांची प्राकलनीय दरांपेक्षा 4.35 टक्के कमी दराची रू. 21,08,98,255/— रकमेची निम्नतम निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 582</u>:— {लोककर्म कार्य. बांध.} नागपुर शहरातील सिमेंट कॉक्रीट रस्ते टप्पा — III अंतर्गत, पॅकेज क्र.— 10 अंतर्गतील 1) रस्ता क्र. 38 नेल्को सोसायटी ते रिंग रोड, भांगे लॉन पर्यंत. 2) रस्ता क्र. 39 व्हेरायटी चौक ते मुंजे चौक ते मेहाडिया चौक ते कॉग्रेस नगर, आनंद मंगल कार्यालय पर्यंत. 3) रस्ता क्र. 40 रिंग रोड, गजानन नगर ते आझाद चौक चुना भट्टी पर्यंत. 4) रस्ता क्र. 41 बाबुलखेडा एन.आय.टी. बगीचा ते वसंत नगर ते भगवान नगर पर्यंत. 5) रस्ता क्र. 42 गोपाल नगर मेन रोड ते माटे चौक ते पडोळे चौक, रिंग रोड पर्यंत. रस्ता सिमेंट कॉक्रीटचा तयार करण्याकरीता रू. 21,61,35,804/— राशीचे कामास्तव मागविण्यात आलेल्या ई—निविदेतील निम्मतम निविदाकार में. खळतकर कन्सट्रक्शन यांची प्राकलनीय दरांपेक्षा 0.99 टक्के कमी दराची रू. 21,39,96,059/— रकमेची निम्नतम निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 583</u>:— {कार्य. अभि. बांधकाम}** नागपुर शहरातील सिमेंट कॉक्रीट रस्ते टप्पा — III अंतर्गत, पॅकेज क्र.— 3 अंतर्गतील 1) रस्ता क्र. 6 के.डी.के. कॉलेज चौका पासून ते शास्त्री नगर चौक ते महावीर चौक ते विकास इंड्रस्टीज पर्यंत. 2) रस्ता क्र. 10 नंदनवन, राजेन्द्र नगर चौका पासून मिडल रिंग रोड हसनबाग मार्गे. 3) रस्ता क्र.11 भिम चौक भांडेवाडी रोड (डम्पीग यार्ड.) रस्ता सिमेंट कॉक्रीट चा तयार करण्याकरीता रू. 24,12,51,359/— राशीचे कामास्तव मागविण्यात आलेल्या ई — निविदेतील निम्मतम निविदाकार में. अभि. ईजिनिअरींग कार्पो. प्रा. लि. यांची प्राकलनीय दरांपेक्षा 4.17 टक्के कमी दराची रू. 23,11,91,177/— रकमेची निम्नतम निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 584</u>:— {कार्य. अभि. बांधकाम}** नागपुर शहरातील सिमेंट कॉक्रीट रस्ते टप्पा — III अंतर्गत, पॅकेज क्र.— 6 अंतर्गतील 1) रस्ता क्र. 21 क्रिडा चौक ते तुकडोजी पुतळा चौका पर्यंत. 2) रस्ता क्र. 22 मेडिकल चौक ते तुकडोजी पुतळा चौक, मेडिकल कॉलेज कंपाउंड लगत मार्गाने. 3) रस्ता क्र. 25 लिंक रोड ते नंदनवन सिमेंट रोड ते मयूर मंगल कार्यालय आय.आर.डी.पी. रस्त्या पर्यंत. 4)रस्ता क्र. 26 वंजारी नगर पाण्याची टाकी ते टि.बी. हॉस्पिटल चौक 5) रस्ता क्र. 27 रिज रोड ते शारदा चौक ते आदर्श मंगल कार्यालय पर्यंत. रस्ता सिमेंट कॉक्रीट चा तयार करण्याकरीता रू. 19,84,85,373/— राशीचे कामास्तव मागविण्यात आलेल्या ई — निविदेतील निम्मतम निविदाकार में. दृष्टी स्ट्रक्चरल इंजि. प्रा. लि. यांची प्राकलनीय दरांपेक्षा 4.59 टक्के कमी दराची रू. 18,93,74,894/— रकमेची निम्नतम निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 585</u>:— {लोककर्म कार्य. बांध.}** नागपुर शहरातील सिमेंट कॉक्रीट रस्ते टप्पा — III अंतर्गत, पॅकेज क्र.— 9 अंतर्गतील 1) रस्ता क्र. 35 दिक्षा भूमी चौक ते नार्थ अंबाझरी रोड पर्यंत. 2) रस्ता क्र. 36 मेडिकल चौक ते आशिर्वाद सिनेमा चौका पर्यंत. 3) रस्ता क्र. 37 मेडिकल चौक ते सरदार पटेल चौक, ग्रेट नाग रोड पर्यंत. 4) रस्ता क्र. 43 देव नगर चौक ते तात्या टोपे हॉल पर्यंत. रस्ता सिमेंट कॉक्रीट चा तयार करण्याकरीता रू. 20,58,99,178/— राशीचे कामास्तव मागविण्यात आलेल्या ई—निविदेतील निम्मतम निविदाकार में. खळतकर कन्सट्रक्शन यांची प्राकलनीय दरांपेक्षा 5.14 टक्के कमी दराची रू. 19,53,15,961/— रकमेची निम्नतम निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 586</u>:— {लोककर्म झोन 08}** प्रभाग क्र. 23 ब त्रिमुर्तीनगर येथे 1) श्री बडवाईक ते श्री गायकवाड व 2) श्री साठवणे ते श्री श्रीनिवास यांचे घरापर्यंत सिमेंट कॉक्रीट रस्त्याचे बांधकाम करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदाकार मे. उल्हास इंटरप्रायजेस यांची प्राकलनीय दरा पेक्षा 17.26 टक्के कमी दराची रु. 37,09,690/— राशीची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 587</u>:— {लोककर्म झोन 08}** प्रभाग क्र. 23 ड हिवरी कोठा येथे पावर हाऊस बाजूला सिमेंट कॉक्रीट रस्त्याचे बांधकाम करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदाकार मे. उल्हास इंटरप्रायजेस यांची प्राकलनीय दरा पेक्षा 14.92 टक्के कमी दराची रू. 25,16,148/— राशीची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 588</u>:— {लोककर्म झोन 05}** प्रभाग क्र. २६ ब अंतर्गत वाठोडा गावातील नाल्याचे सुरक्षा भिंतीचे बांधकाम करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई—निविदातील प्राप्त एकूण तिन निविदाकाराची निविदांपैकी मे. अविनाश एन. कलंबे यांची प्राक्कलनीय दराची प्रथम निम्नतम निविदा राशी

रू. 28,08,335/— रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 589** :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिति यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती,
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर